मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे

# प्रज्ञा शोध व सर्वोत्कृष्टता केंद्र,

## Centre for Talent and Excellence (C.T.S.E.)

# महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा

## Maharashtra Telent Search Examination


नौरोसजी वाडिया महाविद्यालय आवार, पुणे – ४११००१

• वेबसाईट – https : //www.mtsexam.org • ई – मेल mesmtswadia@gmail.com

• दूरध्वनी क्रमांक – (020) 26168486) • (020) 26161479 • M. 8805629765 / 9011902969


महाराष्ट्र व इतर राज्यातील इ. आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी

अनेक स्पर्धा परीक्षा आणि इयत्ता १० वी व १२ वी पातळीवरील

IIT प्रवेश, IISER प्रवेश, NEET, NDA प्रवेश, MHT-CET,

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ऑलिंम्पियाडस्, KVPY व इंजिनियरींग, मेडिकल कॉलेजसाठीच्या इतर प्रवेश परीक्षांच्या

## पायाभूत तयारीसाठी

# माहिती पत्रक

**महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा - तुम्हाला राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी !**

**विद्वान होणे म्हणजे ज्ञानपिपासू आहे. पण प्रज्ञावान होणे म्हणजे त्या ज्ञानाचा विनियोग करू शहाणपण मिळविणे व सभोवतालच्या जगात नाविन्य निर्माण करणे.**

सन १९३२ पासून महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात अतुलनीय योगदान दिलेल्या मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या, उच्च शिक्षणासाठी वाहून घेतलेल्या, सात महाविद्यालयांसह १९९२ पासून प्रज्ञा शोध व सर्वोत्कृष्टता केंद्र अविरत काम करत आहे. या केंद्रामार्फत शालेय तसेच महाविद्यालयीन पातळीवर प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा शोध घेण्याचे काम केले जाते. प्रज्ञावंत असणे ही कोणत्याही राष्ट्राची, धर्माची, जातीची, स्थळाची भाषेची व काळाची मक्तेदारी नाही यावर संस्थेचा पूर्ण विश्वास आहे. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावरील प्रचलित परीक्षा पद्धती प्रज्ञावंतांचा शोध घेऊन प्रोत्साहन देण्यास तसेच त्यांच्या बुद्धीला न्याय देण्यास अपुऱ्या आहेत. ही दोन्ही उद्दिष्टे साध्य करण्याकरिता १९९२ पासून प्रज्ञा शोध व सर्वोत्कृष्टता केंद्र (Venter for Talent Search and Excellence) याद्वारे शालेय स्तरावर महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा घेण्यात येत आहे.

### • परिषदेचे उद्देश

१. प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेणे व त्यांच्या बुद्धीला आव्हान देणाऱ्या परीक्षेद्वारे राज्य स्तरावर गुणवत्ता सिद्ध करण्याचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे.
२. स्पर्धा परीक्षांना बसण्याचा आणि त्यात यश मिळवण्याचा आत्मविश्वास लहान वयातच निर्माण करणे.
३. विद्यार्थ्यांना राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धा परीक्षांची माहिती देणे. त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देण्यासाठी मनुष्यबळ निर्मिती करणे.
४. परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंतांना प्रोत्साहन देण्यासाठी पारितोषिक देऊन उचित गुणगौरव करणे.

### • उपक्रमांचे साध्य

१. प्रज्ञावंतांना सिद्ध करण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध.
२. ग्रामीण तसेच अतिदुर्गम भागातील मागास विद्यार्थ्यांच्यामध्ये स्पर्धा परीक्षांविषयी माहिती आणि जाणीव निर्माण करून देणे आणि त्यासाठी योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देणे.
३. या परीक्षेत गुणवत्ता सिद्ध करून UPSC, MPSC, IIM, IIT-JEE, NEET, CDS, SSC, Bank, NET, SET, GATE, CA या सारख्या अनेक प्रतिष्ठित परीक्षांमध्ये लक्षवेधी यश प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास तयार करणे.

### • परीक्षेस कोणाला बसता येईल?

इ. ८ वी, ९ वी आणि १० वीचे सर्व विद्यार्थी या परीक्षेस बसू शकतात. तसेच ९ वी, १० वी च्या एम. टी. एस. ला बसण्याकरिता इ. ८ वी किंवा ९ वी च्या एम. टी. एस. ला बसलेले / उत्तीर्ण झालेले असण्याची अट नाही. ही परीक्षा अनेक स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त ठरली आहे व या परीक्षेतील अनेक पारितोषिक विजेत्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल यश मिळविले आहे.

### परीक्षेचे स्वरूप :

महाराष्ट्र प्रज्ञा शोध इ. ८ वी, इ. ९ वी, इ. १० वी च्या परीक्षेचे स्वरूप सारखेच असेल.
लेखी परीक्षा – इ. ८ वी, ९ वी किंवा १० वी साठी दोन लेखी पेपर असतील व ते एकाच दिवशी सलग तीन तासात होतील. लेखी परीक्षेतील सर्व प्रश्न बहुपर्यायी असतील.

### परीक्षेचा अभ्यासक्रम :

**पेपर क्रमांक १ : मानसिक क्षमता कसोटी.**

**अभ्यासक्रम** – इ. ८ वी साठी स्कॉलरशिपच्या बुद्धिमत्ता कसोटीच्या काठिण्य पातळीपेक्षा थोड्या वरच्या दर्जाचा असेल आणि इ. ९ वी व इ. १० वी साठी अनुक्रमे इ. ८ वी व इ. ९ वीच्या काठिण्य पातळीपेक्षा वरच्या दर्जाचा असेल.

**पेपर क्रमांक २ : शालेय प्रवणता कसोटी**

**अभ्यासक्रम** – इ. ८ वी, इ. ९ वी, १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या त्यांच्या इयत्तांचा शालेय अभ्यासक्रम असेल.

**मुलाखत** – इ. १० वी च्या लेखी परीक्षेतून निवडलेल्या विद्यार्थ्यांसाठीच असेल व एकूण गुण ५० असतील. मुलाखतीसाठी ठराविक, आखीव अभ्यासक्रम नाही. मुलाखतीद्वारे विद्यार्थ्यांची शालेय विषयांची अकालनशक्ती, उपयोजन, विश्लेषण तसेच दैनंदिन जीवनातील देशी, परदेशी घडामोडींचे ज्ञान, त्यावरील टीकाटिप्पणी करण्याची क्षमता, ज्या परिसरात आपण राहतो त्या परिसराची माहिती, जोपासलेले विविध छंद, स्पर्धा, अभ्यासेतर उपक्रमातील सहभाग इ. बाबींचा विचार केला जाईल.

**इ. ८ वी व ९ वीला मुलाखत असणार नाही.**

**परीक्षेची तयारी**

**शालेय प्रवणता कसोटी** – या करिता विद्यार्थ्यांनी त्या त्या वर्षाची क्रमिक पुस्तके वापरावीत. संपूर्ण वर्षाचा अभ्यासक्रम या परीक्षेकरिता अपेक्षित आहे.

**मानसिक क्षमता कसोटी** – या करिता अनेक प्रकाशकांची पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या सोयीने या पुस्तकांचा वापर करावा. परीक्षेच्या तयारीसाठी मागील प्रश्नपत्रिका संच उपलब्ध आहेत. (पेपर १+२) प्रत्येक इयत्तेकरिता सरावासाठी ५ वर्षांच्या प्रश्नपत्रिकांसाठी रुपये 200/- रोखीने आणि पोस्टाने हवे असल्यास रु. 250/- मनिऑर्डरने अथवा डिमांड ड्राफ्टने पाठवावेत. या करिता आपली इयत्ता, संपूर्ण नाव, परीक्षेचे माध्यम, पत्ता व मोबाईल नंबर कळविणे आवश्यक आहे.

**परीक्षेचे माध्यम :** इंग्रजी, मराठी, उर्दू, हिंदी.

**परीक्षेचे केंद्र व परीक्षा क्रमांक : लेखी परीक्षा :** जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणी या परीक्षेचे केंद्र दिले जाईल. परीक्षेचे केंद्र मिळविण्यासाठी त्या तालुक्यातून / जिल्ह्यातून इ. ८ वी, ९ वी व 10 वी मिळून कमीत कमी १२५ विद्यार्थी असणे आवश्यक आहे. एखाद्या ठिकाणी संख्या कमी असल्यास जवळच्या तालुक्याच्या ठिकाणी सोय केली जाईल. इ. ८/९/१० वी च्या विद्यार्थ्यांचा परीक्षा केंद्र क्रमांक, परीक्षेचे स्थळ आणि परीक्षा क्रमांक इत्यादी माहिती विद्यार्थी ज्या शाळेत शिकत आहे तेथे कळविण्यात येईल. तसेच ही माहिती आमच्या अधिकृत संकेतस्थळावर www.mtsexam.org उपलब्ध होईल. नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही.

**मुलाखत :** १० वीच्या लेखी परीक्षेतून निवडलेल्या विद्यार्थ्यांची मुलाखत नौरोसजी वाडिया कॉलेज, पुणे येथे घेण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या सोयीच्या दृष्टीने इतरत्र मुलाखतीची सोय उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल. त्याकरिता पुरेशी विद्यार्थी संख्या असणे जरूरीचे आहे. मुलाखतीला विद्यार्थ्याला स्वखर्चाने यावे लागेल.

**इ. ८ वी व इ. ९ वी ला मुलाखत असणार नाही. -** दहावीच्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती विषयीची माहिती व परीक्षेचा संपूर्ण निकाल www.mtsexam.org या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात येईल.

मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे

# महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा

## प्रज्ञा शोध व सर्वोत्कृष्टता केंद्र,

नौरोसजी वाडिया महाविद्यालय आवार, पुणे – ४११००१

• वेबसाईट – https : //www.mtsexam.org • ई – मेल mesmtswadia@gmail.com

मा. मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका, दिनांक : 15 / 12 / 2025

स. न. वि. वि.,

मागील शैक्षणिक वर्षासाठीची महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा शनिवार, दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी १७८ परीक्षा केंद्रांवर यशस्वीरीत्या घेण्यात आली. या परीक्षेच्या यशस्वीतेमागे आपणासारख्या शाळांचे मान्यवर मुख्याध्यापक, तुमचे सर्व सहकारी, सर्व राज्य, जिल्हा व तालुका स्तरांवरील समन्वयक यांचे फार मोठे योगदान आहे. इतक्या सर्व केंद्रांवर एकाच दिवशी, एकाच वेळी अत्यंत शिस्तबद्धपणे आणि पारदर्शकपणे ही परीक्षा घेणे म्हणजे शिवधनुष्य पेलण्यासारखेच मोठे आव्हान आहे. पण ते शक्य होते ते आपणा सर्वांच्या मन:पूर्वक सहभागानेच. याबद्दल मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे प्रज्ञा शोध व सर्वोत्कृष्टता केंद्र आपले आभारी आहे. यापुढेही आपले असेच मार्गदर्शन व सहकार्य लाभेल याची खात्री आहे. याचबरोबर आपल्या शाळांमधून या परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही वाढेल अशी आशा व्यक्त करतो.

आपणास माहित आहेच की, या परीक्षेने गेल्या ३३ वर्षात यशाची अनेक शिखरे पादाक्रांत केली आहेत. ही परीक्षा महाराष्ट्राच्या जवळजवळ प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्यात पोहोचली आहे. ही परीक्षा शेजारील गोवा, कर्नाटक व गुजरात मधील काही शाळांतूनही घेतली जाते. या परीक्षेच्या आयोजनास सुरुवात झाल्यानंतर 'राष्ट्रीय प्रज्ञा शोध' परीक्षेच्या निकालांमध्ये संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र राज्य सलग अनेक वर्षे प्रथम क्रमांकावर राहिले आहे. महाराष्ट्र राज्याच्या परीक्षेतील सहभागही मोठ्या प्रमाणात वाढला आहे. ग्रामीण व सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी सुद्धा राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेत तसेच NMMS याही परीक्षेत मोठ्या संख्येने यशस्वी होत आहेत. याचे मुख्य कारण महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेची कार्यपद्धती आणि उद्दिष्टे ही मुख्यत: इ. १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवर घेण्यात येणाऱ्या पुढील महत्त्वाच्या परीक्षांची तयारी करून घेणे हीच आहेत.

१) किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना, गणित / विज्ञान विषयातील स्पर्धा. (KVPY), २) गणित / विज्ञान विषयातील ऑलिम्पियाड परीक्षा, ३) इंजिनिअरिंग प्रवेशासाठी JEE Main / JEE Advance / MHT - CET, ४) मेडिकल / डेंटल प्रवेशासाठी राष्ट्रीय स्तरावर घेण्यात येणारी (NEET) प्रवेश परीक्षा ५) प्रवेश परीक्षा NDA

महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेला इयत्ता ८ वी, ९ वी आणि १० वी च्या वर्गातील शालेय विद्यार्थी असले तरी प्रश्नांचे प्रकार व काठिण्य पातळी ही मात्र वर नमूद केलेल्या परीक्षांप्रमाणेच असते. या सर्व परीक्षा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्य ठरवणाऱ्या आहेत. त्यांची पायाभूत तयारी महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेमुळे नक्की होते आणि प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवरील महत्त्वाच्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश मिळण्याचा मार्ग सुकर होतो. मागील काही वर्षात महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेमध्ये यशस्वी झालेले अनेक विद्यार्थी हे IIM, IIT, SSB, UPSC / MPSC, MBA यामध्ये निवडले गेले आहेत.

**शैक्षणिक वर्ष २०२६-२७** साठीची **महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा शनिवार, दिनांक २५ एप्रिल २०२६** रोजी घेण्यात येणार आहे. परीक्षेसाठी अर्ज भरण्याची मुदत ३० जानेवारी २०२६ पर्यंत आहे. आपल्या शाळेतून महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेला इ. ८ वी / ९ वी / १० वी चे किती विद्यार्थी बसू इच्छितात ही काळविल्यास आवश्यक तेवढी आवेदन पत्रे पाठवण्याची व्यवस्था करण्यात येईल. याशिवाय आपल्या विभागातील समन्वयकांशी संपर्क केल्यास त्यांच्याकडूनही आवेदन पत्रे मिळतील. तसेच विद्यार्थी केंद्राच्या संकेतस्थळावरूनही (https://www.mtsexam.org) अर्ज भरू शकतील. (ऑनलाईन अर्ज भरल्यावर परत लेखी अर्ज भरू नये. कोणत्याही एका माध्यमातून अर्ज एकदाच भरावा.) या माहिती पत्रकासोबत MTS चा एक फॉर्म पाठवित आहे. आपणास लागतील तेवढ्या झेरॉक्स प्रती करून घेऊ शकता. आपल्या शाळेतील इयत्ता ८ वी, ९ वी आणि १० वी च्या विद्यार्थ्यांना या परीक्षेत बसण्यासाठी प्रोत्साहन द्यावे ही विनंती. या पुढेही आपले सहकार्य मिळेल असा विश्वास आहे.

धन्यवाद !

## आपला स्नेहांकित,

| **डॉ. ए. एस. चांडक** | **प्रा. सचिन सानप** | **डॉ. अनिता हमंद** |
|---|---|---|
| विश्वस्त | विश्वस्त | विश्वस्त |
| मॉडर्न एज्युकेशन सोसायटी | मॉडर्न एज्युकेशन सोसायटी | मॉडर्न एज्युकेशन सोसायटी |

## कार्यकारी मंडळ

| **डॉ. गणेशन रामस्वामी** | **डॉ. अलका महाजन** | **प्रा. जी. सी. कुलकर्णी** | **प्रा. दिलीप शेंडे** |
|---|---|---|---|
| **C F O** | **C E O** | **सल्लागार** | **संचालक** |
| **मॉडर्न एज्युकेशन सोसायटी** | **मॉडर्न एज्युकेशन सोसायटी** | **सी. टी. एस. ई.** | **सी. टी. एस. ई.** |

## प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

| इयत्ता | पेपर क्र. १ | पेपर क्र. २ | एकूण | | वेळ | मुलाखत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रश्न | गुण | | |
| ८ वी<br>९ वी<br>१० वी | मानसिक क्षमता कसोटी<br>१०० प्रश्न<br>१०० गुण<br>वेळ ९० मिनिटे | **शालेय प्रणवता कसोटी**<br>**विज्ञान**<br>१५ १५ १०<br>(भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र) ४० प्रश्न<br>**सामाजिक शास्त्र**<br>१५ १५ १०<br>(इतिहास, भूगोल, नागरीकशास्त्र) ४० प्रश्न<br>**गणित**<br>(बीजगणित, अंकगणित, भूमिती) २० प्रश्न<br>**एकूण १०० प्रश्न, १०० गुण, वेळ ९० मिनिटे** | २०० | २०० | १८० मिनिटे | इ. ८ वी<br>इ. ९ वी साठी मुलाखत नाही.<br><br>इ. १० वी साठी ५० गुण |

**परीक्षेच्या निकालाचे वेळापत्रक :**

१. लेखी परीक्षा शनिवार दिनांक २५ एप्रिल २०२६ यादिवशी सकाळी 11:00 ते दुपारी 2:00 या दरम्यान घेण्यात येईल. परंतु विद्यार्थ्यांनी सकाळी १०:३० वाजता आपल्या जागेवर हजर राहणे आवश्यक आहे.

२. इ. १० वीच्या ज्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षेतून निवड होईल त्यांना मुलाखतीसाठी साधारण मे-जून महिन्यात बोलाविले जाईल. त्यासंबंधी विद्यार्थ्याला त्याच्या घरच्या पत्त्यावर पत्र पाठविले जाईल. तसेच शाळेलाही कळविण्यात येईल.

३. इ. ८ वी, ९ वी व १० वीच्या इतर सर्व विद्यार्थ्यांना त्यांचा संपूर्ण निकाल त्यांच्या शाळेच्या पत्त्यावर पोस्टाने कळविण्यात येईल व तसेच आमच्या वेबसाईटवरही देण्यात येईल.

**पारितोषिके व अन्य बक्षीसे**

महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेची गुणवत्ता यादी दोन स्तरावर असेल.

**(अ) राज्यस्तरीय गुणवत्ता यादी (ब) जिल्हास्तरीय गुणवत्ता यादी**

प्रत्येक स्तरात ग्रामीण व शहरी असे दोन विभाग असतील. शहरी विभागात सर्व जिल्ह्यांची ठिकाणे व महानगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या शाळा समाविष्ट केल्या जातील. सर्व खेडी व तालुक्याची गावे ग्रामीण समजण्यात येतील. बक्षीसांसाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ही एकूण बसलेले विद्यार्थी व त्यांनी मिळविलेले गुण यावर अवलंबून असेल.

१) **राज्यस्तरीय पारितोषिक :** राज्य गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना रु. १०००/- चे महाराष्ट्र प्रज्ञाशोध पारितोषिक एक वर्षाकरिता देण्यात येईल.

२) **जिल्हास्तरीय पारितोषिक** : जिल्हा गुणवत्ता यादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. ४००/- चे पारितोषिक एक वर्षाकरता देण्यात येईल.

३) **विशेष पारितोषिके** :

अ) ज्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय अथवा जिल्हास्तरीय पारितोषिकासाठी निवड झाली नसेल अशा निवडक विद्यार्थ्यांना रु. २००/- विशेष पारितोषिक एक वर्षाकरिता दिले जाईल.

ब) **तालुका पारितोषिके** : हे प्रत्येकी रु. १५०/- एक वर्षाकरीता, राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व विशेष पारितोषिक यादीत नसलेल्या परंतु तालुक्यात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या काही विद्यार्थ्यांना देण्यात येईल. हे पारितोषिक फक्त ग्रामीण भागासाठी असेल.

क) **उत्तेजनार्थ पारितोषिके** : याशिवाय काही विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिके एक वर्षाकरिता देण्यात येतील. (रु. १००/- प्रत्येकी)

ड) **गुणवत्ता पारितोषिके :** राज्यस्तरीय गुणवत्ता यादीतील प्रत्येक विभागात गुणानुक्रमे पहिल्या तीन विद्यार्थ्यांना रु. ५०००/-, रु. ३०००/-, रु. २०००/- ची पारितोषिके देण्यात येतील.

लेखी परीक्षेतील प्रत्येक पेपरमध्ये व विभागात (गणित, नैसर्गिक शास्त्रे व सामाजिक शास्त्रे) प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. ५००/- चे स्वतंत्र बक्षीस देण्यात येईल. जर जास्त विद्यार्थ्यांना एखाद्या विषयात अथवा पेपरमध्ये सर्वाधिक गुण मिळाले तर ही पारितोषिके विभागली जातील. तरी ही प्रत्येकास किमान रु. १००/- देण्यात येतील.

इ) **इतर माध्यम पारितोषिके :** रु. ४००/- चे पारितोषिक हिंदी, उर्दू माध्यमाच्या एकुणात ५० टक्कयांहून अधिक व जास्तीत जास्त गुण मिळवणाऱ्यास देण्यात येईल.

४) लेखी परीक्षेत २०० पैकी ७० किंवा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रके देण्यात येतील.

**अर्ज कसा मिळवावा?**

आपल्या शाळेतून जेवढे विद्यार्थी बसणार असतील त्यांची (इ. ८/९/१० वी) संख्या आपल्या शाळेच्या लेटरहेडवर पाठविल्यास आम्ही आपल्याला फॉर्म पाठवू. भरलेल्या फॉर्मस् बरोबर पैसे पाठविले तरी चालतील. न वापरलेले फॉर्म परत पाठवावेत.

**परीक्षेचे शुल्क**

१) शाळेमार्फत अर्ज मागविल्यास प्रत्येकी रु. २००/-

२) व्यक्तीशः अर्ज पोस्टाने मागविल्यास रु. २५०/- पाठवावेत.

३) या कार्यालयातून / आमच्या समन्वयकांकडून अर्ज घेतल्यास रु. २००/- रोख द्यावेत.

https://www.mtsexam.org या आमच्या वेबसाइटवरून ऑनलाइन अर्ज भरता येईल. तसेच परीक्षा फी सुद्धा ऑनलाइन भरता येईल. यासाठी Credit Card / Debit Card / Net Banking / UPI हे सर्व पर्याय उपलब्ध आहेत.

**ऑनलाईन अर्ज भरताना एकूण रु. २२५/- प्रति विद्यार्थी भरावे लागतील.**

पोस्टाने अर्ज मागविताना विद्यार्थ्याने नाव, पिनकोडसहित संपूर्ण पत्ता व इयत्ता सुस्पष्ट अक्षरात लिहावे. मनीऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट मानद संचालक, महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा, पुणे यांच्या नावे पुण्यात प्राप्त होईल अशा रीतीने पाठविणे.

**चेक स्वीकारले जाणार नाहीत.**

आपल्या शाळेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या परीक्षेला बसण्यास उद्युक्त करावे ही विनंती. आपल्या शाळेतील इयत्ता ८/९/१० वी चे किती विद्यार्थी परीक्षेला बसू इच्छितात हे कळविल्यास तेवढी आवेदन पत्रे आम्ही आपणास पाठवू.

परीक्षे संदर्भातील अद्ययावत माहिती www.mtsexam.org या वेबसाइटवर उपलब्ध असेल. त्यासाठी वेळोवेळी वेबसाईट पहावी. नंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

# अर्ज पाठविण्याची अंतिम मुदत : शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६

## कृपया आपल्या अर्जाची मागणी ताबडतोब नोंदवा.

## महत्वाची सूचना

**काही संस्था इतर काही इयत्तांसाठी महाराष्ट्र प्रज्ञा शोध या नावानेच परीक्षा घेत आहेत. अशा परीक्षांशी आमचा काहीच संबंध नाही. आमची संस्था फक्त इयत्ता आठवी, नववी व दहावीसाठी 'महाराष्ट्र प्रज्ञा शोध' परीक्षा आयोजित करीत असते याची कृपया नोंद घ्यावी. महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेच्या प्रकल्पात काम करणारे शिक्षक, समन्वयक किंवा पदाधिकारी हे सेवाभावी वृत्तीने यात सहभागी होतात. या कामाकरिता कोणतेही कमिशन अथवा आर्थिक लाभ त्यांना मिळत नाही.**

## मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, पुणे.

**'मॉडर्न एज्युकेशन सोसायटी'** केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशभरात नावलौकिक असलेली उच्च शिक्षण क्षेत्रात काम करत असलेली संस्था आहे. संस्थेची स्थापना दिनांक १५ फेब्रुवारी १९३२ रोजी झाली. आता संस्थेची वाटचाल शतक महोत्सवाकडे चालू आहे. या संस्थेला नामवंत तसेच तज्ञ शिक्षक, प्राध्यापक, संशोधक आणि अनेक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा वैभवशाली वारसा लाभलेला आहे. संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांमध्ये सुप्रसिद्ध अभिनेते राजेश खन्ना, ऐश्वर्या राय, बोम्मन इराणी तसेच सुप्रसिद्ध खेळाडू चेतन चौहान, चंदू बोर्डे, ऋषिकेश कानिटकर, राजकीय नेते पतंगराव कदम, प्रतापसिंह राणे, विख्यात अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, इतिहास तज्ञ डॉ. रोमिला थापर तसेच 'क्विकहील टेक्नोलॉजीज्' चे संजय काटकर अशा विविध क्षेत्रांतील नामवंत व्यक्तींचा समावेश आहे.

या संस्थेची पुणे आणि मुंबई येथे सात महाविद्यालये असून त्यामध्ये अभियांत्रिकी पदवी आणि पदविका, विज्ञान, कला, वाणिज्य या शाखांमधील पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विविध पारंपरिक अभ्यासक्रम चालवले जातात. याचबरोबर आधुनिक काळातील उद्योग, सेवा आणि इतर क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन संगणकशास्त्र, व्यवस्थापन तसेच जैव तंत्रज्ञान अशा शाखेतील विविध अपारंपरिक आणि अद्ययावत अभ्यासक्रमही चालवले जातात. या संस्थेच्या सर्व महाविद्यालयांचे अभ्यासक्रम हे विद्यापीठ मान्यताप्राप्त असून विद्यार्थीवर्ग आणि शिक्षण क्षेत्रात लोकप्रिय आहेत. संस्थेचा अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांना "NAAC" द्वारे उत्कृष्ट मानांकन मिळालेले आहे.

संस्थेच्या अंतर्गत उत्तम दर्जाची विज्ञान, कला आणि वाणिज्य शाखेतील कनिष्ठ महाविद्यालये आहेत. त्यांना उत्तम निकालाची परंपरा असून अनेक विद्यार्थ्यांनी आय. आय. टी., मेडिकल, इंजीनियरिंग, चार्टर्ड अकाऊंटंट सारख्या महाविद्यालयांमध्ये / अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळविला आहे. संस्थेच्या सर्व वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये उत्कृष्ट दर्जाच्या प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालये आणि अद्ययावत संगणक व इतर सुविधा आहेत. याचबरोबर नामवंत आणि तज्ञ प्राध्यापकवर्ग आहे. आजही शताब्दीकडे वाटचाल करताना संस्थेला विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण देण्याचा ध्यास आहे आणि 'For the Spread of Light' या संस्थेच्या ब्रीदवाक्याप्रमाणे वाटचाल चालू आहे.

### नौरोसजी वाडिया महाविद्यालय पुणे, (स्थापना १९३२)

कनिष्ठ महाविद्यालय : ११ वी आणि १२ वी (विज्ञान आणि कला शाखा)

**वरिष्ठ महाविद्यालय :**

- B.Sc. (Botany, Chemistry Electronics, Geology, Geography, Mathematics, Physics, Zoology)
- B.Sc. (Computer Science, Information Technology, Economics, Cyber Security & Digital Forensics, Biotechnology)
- B.A. English Economics, Geography, History, Mathematics Marathi Political Science, Psychology
- M.A. & M.Sc

**अधिक माहितीसाठी संपर्क :- https://nowrosjeewadia.mespune.org. nwc_91years, nwcpune_official**

### कुस्रो वाडिया इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे (स्थापना १९३८)

(All India Council for Technical Education (AICTE) approved Institute)

**Diploma courses in :**

- Electrical Engineering
- Civil Engineering
- Electronics & Telecommunication Engineering
- Mechanical Engineering
- Computer Engineering
- Computer Engineering & IoT

**अधिक माहितीसाठी संपर्क:- https://cwit.mespune.org**

### डी. जी. रुपारेल कॉलेज, मुंबई (स्थापना १९५२)

कनिष्ठ महाविद्यालय : ११ वी व १२ वी (विज्ञान, वाणिज्य आणि कला शाखा)

**वरिष्ठ महाविद्यालय :**

- B. Sc. (Mathematics, Botany, Physics, Chemistry, Statistics and Zoology)
- B. Com. B. A. (English, Economics, History, Marathi, Philosophy, Political Science and Psychology)
- B. Sc. (Information Technology, Computer Science)
- B. M. S. (Bachelor of Management Science)
- M. Sc.
- M.A.
- M. Com.

**अधिक माहितीसाठी संपर्क:- https://www.ruparel.edu**

### न्यू लॉ कॉलेज, मुंबई (स्थापना १९५४)

**L. L. B.**

**अधिक माहितीसाठी संपर्क:- https://nlc.mespune.org**

### नेव्हिल वाडिया इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, पुणे (स्थापना १९९१)

- **B. B. A.**
- **M. B. A.**

**अधिक माहितीसाठी संपर्क:- https://nwimsr.mespune.org**

### नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे (स्थापना १९६९)

कनिष्ठ महाविद्यालय : ११ वी व १२ वी वाणिज्य शाखा

वरिष्ठ महाविद्यालय :

- B. Com.
- B.B.A.
- B.B.A. (International Business)
- B. B. A. (Computer Applications)
- B.Voc.
- M. Com.

**अधिक माहितीसाठी संपर्क :-**

**https://nwcc.mespune.org**

### वाडिया कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे (स्थापना १९९९)

- B.E./B.Tech. Computer Engineering
- BE/B.Tech. E & TC Engineering
- BE/B.Tech. Mechanical Engineering
- B.E./B.Tech. Automation and Robotics Engineering
- M.E./M.Tech.

**अधिक माहितीसाठी संपर्क:-**

**https://mescoe.mespune.orgwadiacoc** **wadiacoe**